नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प,

वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी आणि भारत मौसम विभाग

ईमेल - mahapocra@gmail.com, gkmsparbhani@gmail.com

जालना कृषी हवामान सल्ला शुक्रवार दिनांक – १०.०१.२०२०

हवामान घटक	हवामान अंदाज (दिनांक ११ जानेवारी ते १५ जानेवारी २०२०)				
दिनांक	११/०१	१२/०१	१३/०१	१४/०१	१५/०१
पाऊस (मिमी)	००.०	००.०	००.०	००.०	००.०
कमाल तापमान (अं.से.)	३०.०	३१.०	२९.०	३०.०	२९.०
किमान तापमान (अं.से.)	१३.०	१४.०	१५.०	१५.०	१५.०
ढग स्थिती (आकाश)	स्वच्छ	स्वच्छ	स्वच्छ	स्वच्छ	स्वच्छ
सकाळची सापेक्ष आर्द्रता (%)	६२	४८	४१	६६	६४
दुपारची सापेक्ष आर्द्रता (%)	३५	३४	२७	२४	२८
वा-याचा वेग (किमी / तास)	१०	०७	०७	०९	०७
वा-याची दिशा	पुर्व	पुर्व	आग्नेय	नैऋत्य	आग्नेय
हवामानाचा इशारा	जिल्हयात पुढील पाच दिवसात आकाश स्वच्छ राहुन किमान तापमानात किंचीत घट होईल.				

पिकांचे नाव	अवस्था	कृषि हवामान सल्ला
हरभरा	वाढीची अवस्था	हरभरा पिकात घाटे अळीचा प्रादुर्भाव दिसुन आल्यास याच्या व्यवस्थापनासाठी क्विनॉलफॉस २५ टक्के ईसी २० मिली प्रती १० लिटर पाण्यात किंवा इमामेक्टीन बेन्झोएट ५ % ४.५ ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.
गहु	वाढीची अवस्था	गव्हाच्या पिकात उंदरांचा प्रादुर्भाव दिसुन आल्यास याच्या नियंत्रणासाठी झिंक फॉस्फाईड १ भाग + गुळ १ भाग + ५० भाग गव्हाचा भरडा व थोडेशे गोडतेल मिसळुन हे मिश्रण उंदराच्या बिळात टाकुन बिळे बंद करावीत. गहु पिकावर तांबेरा रोगाचा प्रादुर्भाव दिसुन आल्यास याच्या व्यवस्थापनासाठी झायनेब किंवा मॅन्कोझेब (७५ डब्ल्युपी) २५ ग्रॅम प्रोपीकोनॅझोल २५ टक्के ईसी १० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.
ऊस	वाढीची अवस्था	पाण्याची उपलब्धता असल्यास हंगामी ऊस पिकाच्या लागवडीसाठी पुर्व मशागतीची कामे पुर्ण करून घ्यावी.
हळद	कंद वाढीची अवस्था	उशिरा पेरणी केलेल्या हळद पिकात पानावरील ठिपके रोगाच्या व्यवस्थापनासाठी मॅन्कोझेब (७५ डब्ल्युपी) २५ ग्रॅम किंवा कार्बेन्डाझिम (५० डब्ल्युपी) १० ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.
संत्रा /मोसंबी	फळ वाढीची अवस्था	संत्रा / मोसंबी फळबागेत तणांचे नियंत्रण करून पाणीव्यवस्थापन करावे.
डाळिंब		मृगबहार धरलेल्या डाळिंब फळबागेतील काढणीस तयार असलेल्या व काढणी न केलेल्या फळांची काढणी करून घ्यावी.

फुल शेती	कळया लागणे अवस्था	गुलाब पिकावरील कळया खाणारी अळीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास याच्या व्यवस्थापनासाठी ५ टक्के निंबोळी अर्काची फवारणी करावी.
भाजीपाला	फळवाढीची अवस्था	मिरची पिकावरील भुरी रोगाच्या व्यवस्थापनासाठी मायक्लोब्युटॅनील १० टक्के डब्ल्युपी १० ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. भाजीपाला पिकावरील रसशोषन करणाया किडींच्या-व्यवस्थापनासाठी फेन्प्रोपेथ्रीन ३० टक्के ३ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी . .काळी पाणी दयावेसाठी भाजीपाला पिकास संध्याभाजीपाला पिकांचे थंडीपासून संरक्षण करण्या
चारा पिके	वाढीची अवस्था	तृणवर्गीय चारा पिकाची लागवड करून एक महिन्याचा कालावधी झाला असल्यास नत्र खताचा दुसरा हप्ता ५० किलो नत्र प्रती हेक्टरी देऊन पिकास पाणी दयावे.

सदर कृषी सल्ला पत्रिका वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी येथील ग्रामीण कृषी मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीवरून तयार करून, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प कार्यालय मुंबई येथून प्रसारित करण्यात आलेली आहे.